# फायनान्स अँण्ड अकाउंट्स एम्प्लॉईज युनियन

प्लॉट नं. १२, रवी नगर, धुळे रोड, अमळनेर, जळगाव ४२५ ४०१
(रजि.नं. एनएसके/जे/२३८२)

विशाल लोहार अध्यक्ष ९६६५२०२७३६ | विजय जाधव महासचिव ९३०९८१७९८३ | प्रितम घोगरे उपाध्यक्ष ९३७०९३१५९२

संदीप तिकटे कोषाध्यक्ष ९७६६२०९६७८

प्रशांत नरड प्रसिद्धी प्रमुख ९१४६६८६२२०

लक्ष्मीकांत पवार सहसचिव ९६६५३०५५७७

विलास लकडे सहसचिव ९६३७४१५४४५

स्नेहल वैष्णव महिला प्रतिनिधी ९६३७४१५४४५

परेश कलंत्री संघटक ९७६७४०१४५३


जा.क्र.FAEU/०२१ दिनांक: १७/१२/२०२५

**प्रति,** **(<u>ईमेल द्वारे</u>)**
मा. संचालक (मा.सं.),
महावितरण मुख्यालय, प्रकाशगड,
मुंबई- ०५१.

**विषय-** पुनर्रचनेनंतर बिलिंग टीम मधील अपुरे मनुष्यबळ व बिलिंग विभागावर वाढलेला कामाचा ताण याबाबत.
**संदर्भ-**१) दि.१५/१०/२०२५ रोजीच्या मुख्य कार्यालय यांच्या द्वारे आयोजित बैठकीत झालेल्या चर्चे अंतीचा निर्णय.
२) मुख्य कार्यालयाद्वारे स्मार्ट मीटर चे DCU द्वारे रिडींग बंद करून रिडींग एजन्सी मार्फत म्यानुअल रिडींग घेण्याबाबतचे आदेश.

**महोदय,**

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरून आपणास नम्रपणे निर्दशनास आणून देण्यात येते की, महावितरण कंपनी स्थापनेपासून ते आज पर्यंत बिलिंग विभागातील विविध कामे सुरळीत होण्यासाठी होण्यासाठी वेळोवेळी विविध प्रकल्पाच्या माध्यमातून बदल करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये मीटर रिडींग वाचनामध्ये प्रामुख्याने **फोटो रिडिंग , मोबाईल ॲप, HHU रिडिंग, RF DCU रिडिंग,** इत्यादी बदल/प्रकल्प अवलंबवून वीज बिल तक्रारी कमी होतील या उद्देशाने बिलिंग मापदंड सुधारण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी कुठल्याही विशेष प्रशिक्षणाशिवाय लेखा कर्मचारी यांनी पूर्णतः सदरील बदलत्या प्रणाली अवगत करून पूर्ण क्षमतेने काम केलेले आहे आणि करत आहेत. मात्र बिलिंग कर्मचाऱ्यावरील कामाचा ताण कमी होणे अपेक्षित असताना तसे झालेले दिसून येत नाही. मुख्य कार्यालयाच्या विविध बैठकांमध्ये स्मार्ट मीटर बसविल्यानंतर बिलिंग मधील कामाचा ताण कमी होईल या धर्तीवर पुनर्रचनेत बिलिंग टीम मधील कमर्चारी यांची कपात करून सदर लेखा कर्मचाऱ्यांची इतर टीम मध्ये नेमणूक केलेली आहे.

**<u>B&R उपविभागातील बिलिंग टीम वाढविण्याबाबत व कार्यालयीन वेळेशिवाय अतिरिक्त काम केल्याचा अतिकालिक (OVERTIME) मोबदला देऊन खालील बाबींचा गांभीर्याने विचार होणे अपेक्षित आहे.</u>**

1. वीज देयकबाबत तक्रार घेऊन कार्यालयात येणाऱ्या ग्राहकांची संख्या आणि त्यांच्या शंकेचे निरसन होण्याकरिता खर्च होणारा संबंधित बिलिंग टीमचा वेळ याचे मोजमाप होणे अपेक्षित आहे. स्मार्ट मीटर बसवताना होणाऱ्या चुकांमुळे अवास्तव वीज देयकांची संख्या, मुख्य कार्यालयातील B&R मधून होणाऱ्या वेगवेगळ्या बदलामुळे ग्राहकांच्या तक्रारीत अनावश्यक वाढ होत आहे (उदा. **सरासरी ग्राहकांना अवास्तव आकारण्यात येणारे सरासरी युनिट, सोलर ग्राहकांना M30 Asses नुसार केवळ इम्पोर्ट चे बिलिंग होणे, smart asses ने बिलिंग होणे**)
2. स्मार्ट मीटर बसल्यानंतर त्याचे रिडींग DCU द्वारे होऊन बिलिंग विभागातील कामाचा ताण कमी होईल असे पुनर्रचना लागू करताना सांगण्यात आले होते. परंतु **स्मार्ट मीटर बसवून देखील १०० % म्यानुअल रिडींग घेण्याचे तोंडी आदेश महावितरण प्रशासना मार्फत रिडींग एजन्सी ला देण्यात आले आहे.** या बाबीमुळे बिलिंग मधील पुनर्चनेपूर्वीच्या कामामध्ये कुठलाही बदल होणार नाही, परंतु पुनर्रचनेमध्ये बिलिंग कर्माचाऱ्यांची बिलिंग मधून कपात केल्यामुळे याचा अतिरिक्त ताण इतर कर्मचारी यांचेवर येत आहे.
3. पुनर्रचना लागू झाल्यास ते आता पर्यंत पुनर्रचना समितीने बिलिंग टीम मधील कामे प्रत्यक्ष उपविभागात भेट देऊन B & R उपविभागात दिवसभरात ग्राहकांची तक्रार घेऊन येणारी संख्या पाहणे अपेक्षित आहे. त्यांच्या तक्रारीचे निरसन करताना संवाद साधताना सिस्टीम च्या उपरोक्त बदलामुळे कश्याप्रकारे बिलिंग कर्मचाऱ्यांना ग्राहकांच्या रोषाला सामोरे जावे लागत

# फायनान्स अँण्ड अकाउंट्स एम्प्लॉईज युनियन

*प्लॉट नं. १२, रवी नगर, धुळे रोड, अमळनेर, जळगाव ४२५ ४०१*

***(रजि.नं. एनएसके/जे/२३८२)***

| विशाल लोहार | विजय जाधव | प्रितम घोगरे |
|---|---|---|
| अध्यक्ष | महासचिव | उपाध्यक्ष |
| ९६६५२०२७३६ | ९३०९८१७९८३ | ९३७०९३१५९२ |

**संदीप तिकटे**
*कोषाध्यक्ष*
९७६६२०९६७८

**प्रशांत नरड**
*प्रसिद्धी प्रमुख*
९१४६६८६२२०

**लक्ष्मीकांत पवार**
*सहसचिव*
९६६५३०५५७७

**विलास लकडे**
*सहसचिव*
९६३७४१५४४५

**स्नेहल वैष्णव**
*महिला प्रतिनिधी*
९६३७४१५४४५

**परेश कलंत्री**
*संघटक*
९७६७४०१४५३


आहे ते स्पष्ट होईल.

4. बिलिंग विभागातील अनेक कामे ही सुट्टीच्या दिवशी किंवा कार्यालयीन वेळेशिवाय पार पाडावी लागतात. ऑनलाईन पार पाडल्या जाणाऱ्या कामामुळे साप्ताहिक सुट्टीवर गदा आणली जात आहे. यामुळे बिलिंग कर्मचारी यांचे कौटुंबिक जीवन विस्कळीत झाले आहे. याव्यतिरिक्त, सुट्टीच्या दिवशी चालू login ID/Active Users द्वारे तपासून देखील पुष्टी करण्यात यावी. वेब प्रणाली कार्यालयीन वेळेत विना अडथळा चालत नसल्याने बिलिंग कर्मचाऱ्यांना कार्यालयीन वेळेशिवाय सुट्टीच्या दिवशीहि कौटुंबिक वेळ देऊन बिलिंग ची कामे करावी लागत आहेत. तसेच cluster बिलिंग असल्यामुळे शनिवार रविवार सुट्टीच्या दिवशीहि बिलिंग ची कामे करावी लागत आहेत. त्यामुळे बिलिंग कर्मचाऱ्यांना अतिकालिक मोबदला देण्यात यावा.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार होणे अत्यंत गरजेचे आहे. पुनर्रचनेनंतर बिलिंग विभागात सुसूत्रता येऊन कामाचा ताण कमी होणे अपेक्षित असताना केवळ बिलिंग बाबतीत पुनर्रचना उलट्या दिशेने लागू होत असल्याचे दिसून येत आहे. **खेदजनक बाब म्हणजे हा प्रकार महावितरण कंपनीत केवळ लेखा विभागात झाला आहे इतर विभागातील कर्मचारी यांच्या कामाचा ताण कमी होऊन प्रशासनाने ८ तास काम यावर यशस्वी रित्या प्रयत्न केले त्याचे संघटनेच्या वतीने अभिनंदन करण्यात येत आहे. मात्र बिलिंग कमर्चारी यांच्या बाबतीत प्रशासनाने दुजाभाव केल्याची भावना लेखा कर्मचारी यांच्या मनात निर्माण झालेली आहे. त्यामुळे बिलिंग विभागातील अपुऱ्या मनुष्य बळामुळे बिलिंग ची मापदंड खालावल्यास त्याला लेखा कर्मचारी जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.**

संदर्भ क्र २ नुसार मा.कार्यकारी संचालक यांनी दि १५/१०/२०२५ रोजीच्या बैठकीत हि चर्चे अंती B & R उपविभागातील इतर टीम मध्ये देण्यात आलेले बिलिंग चे कर्मचारी हे बिलिंग टीम मध्ये देण्यात येतील यासाठी संमती दर्शविली होती.तरी या पत्राद्वारे आपणास विनंती करण्यात येते कि बिलिंग कर्मचारी यांच्या कामाचा ताण व उपरोक्त सर्व बाबींचा विचार करून बिलिंग टीम मधील कर्मचारी संख्या वाढविण्यात यावी तसेच कार्यलयीन वेळेशिवाय सुट्टीच्या दिवशी हि कार्यालयीन काम करावे लागत असल्याने लेखा कर्मचाऱ्यांना overtime देण्याबाबत आदेश जारी करण्यात यावेत.जेणेकरून पुनर्रचनेचा मूळ उद्देश कर्मचारी यांच्या कामात सुसूत्रता आणून दर्जेदार ग्राहक सेवा देणे हे साध्य करता येईल.

| अध्यक्ष | महासचिव |
|---|---|
| **विशाल लोहार** | **विजय जाधव** |

**प्रत सविनय सादर.**

1.मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महावितरण मुख्यालय, प्रकाशगड, मुंबई.
2. मा. संचालक (संचलन), महावितरण मुख्यालय, प्रकाशगड, मुंबई.
3. मा. संचालक (वित्त), महावितरण मुख्यालय, प्रकाशगड, मुंबई
4. मा. अध्यक्ष, पुनर्रचना समिती, महावितरण मुख्यालय, प्रकाशगड, मुंबई.
5. मा. कार्यकारी संचालक (मा.सं.), महावितरण मुख्यालय, प्रकाशगड, मुंबई.
6. मा. मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महावितरण मुख्यालय, प्रकाशगड, मुंबई.